महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
संचालनालय,लेखा व कोषागारे
कस्तुरी इमारत, तळ मजला,
पेट्रोलियम हाऊस समोर ,ज,चर्चगेट ,मार्ग.द. मुंबई - ४०० ०२०.
दूरध्वनी क्रमांक:०२२- २२८८०१०६/१७ ईमेल : ad.admin@mahakosh.in संकेतस्थळ:www.mahakosh.gov.in

क्र.संलेको/प्रशा-राप/राजभवन/ले.अ./1225 दिनांक : 26 SEP 2024

विषय : महाराष्ट्राचे मा.राज्यपाल यांचे सचिव कार्यालयातील, राजभवन मलबार हिल, मुंबई येथील लेखा अधिकारी गट-ब (राजपत्रित) हे पद प्रतिनियुक्तीने भरणेबाबत.

महाराष्ट्राचे मा.राज्यपाल यांचे सचिव कार्यालय, वाळकेश्वर रोड, मलबार हिल, मुंबई येथील महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेतील लेखा अधिकारी गट-ब (राजपत्रित) हे पद प्रतिनियुक्तीने भरावयाचे आहे.

सदर कार्यालयातील प्रचलित कार्यपद्धतीनुसार खालील अर्हता व अनुभव धारण करीत असलेल्या लेखा अधिकाऱ्यांची आवश्यकता आहे.

१) मागील पाच वर्षांचे गोपनीय अहवाल किमान उत्कृष्ट दर्जाचे असावेत.
२) सेवार्थ प्रणाली, बिल पोर्टल, वेतनिका, बिडीएस (अर्थसंकल्पीय प्रणाली) व इतर संगणक हाताळणीचे उत्तम प्रकारे ज्ञान असणे आवश्यक आहे.
३) तसेच आस्थापना विषयक व लेखा विषयक कामकाजाचा अनुभव असणेही आवश्यक आहे.

कार्यरत पदावर किमान १ वर्ष सेवा झालेले, सामान्य प्रशासन विभाग अधिसूचना दि.१४.०७.२०२१ नुसार कोकण-२ महसूल विभाग संवर्ग लागू असलेले तसेच सदर अधिसूचनेतील अ.क्र.१२ नुसार महसूल विभाग संवर्ग बदलून मिळणेसाठी आवश्यक अटींची पूर्तता करीत असलेले अधिकारीच राजभवन येथील लेखा अधिकारी पदासाठी अर्ज करण्यासाठी पात्र राहतील.

तरी महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेतील वर नमुद अर्हता पूर्ण करीत असलेल्या इच्छुक लेखा अधिकाऱ्यांनी त्यांचे अर्ज दि.२८.०९.२०२४ पर्यंत संचालनालयास सादर करावेत. प्राप्त नामिकासूचीच्या आधारे लेखा अधिकारी यांची मुलाखत मा.राज्यपालांचे सचिवालय यांचे कार्यालयाकडून घेण्यात येईल.

रश्मी नांदिवडेकर

(रश्मी नांदिवडेकर)
सहसंचालक (प्रशासन),
लेखा व कोषागारे, मुंबई

प्रत : महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा गट-ब (राजपत्रित) लेखा अधिकारी संवर्गातील सर्व अधिकारी.